आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

२६ ऑक्टोबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठी भाजपासह महाविकास आघाडीच्या तिन्ही घटक पक्षांकडून उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

- उद्धव ठाकरे आणि काँग्रेसमध्ये जागांच्या अदला बदलीसंदर्भात चर्चा, अमित ठाकरेंना पाठिंबा देण्याचा महायुतीचा प्रयत्न

- दुर्गम भागातल्या मतदारांसाठी राज्यात ९१५ मतदान केंद्र, रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक २३२ शॅडो मतदान केंद्र

**आणि**

- न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यासह भारतानं मालिकाही गमावली

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं आज २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. त्यात नाशिक मध्य मतदारसंघातून देवयानी फरांदे, उल्हासनगरमधून कुमार आयलानी, खडकवासला इथून भिमराव तापकीर, पुणे छावणीतून सुनील कांबळे, कसबा पेठेतून हेमंत रासने यांना उमेदवारी मिळाली आहे. जतमधून गोपीचंद पडळकर, सोलापूर शहर मध्य मधून देवेंद्र कोठे, लातूर ग्रामीणमधून रमेश कराड, पंढरपुरातून समाधान आवताडे यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. आतापर्यंत भाजपाचे १२१ उमेदवार जाहीर झाले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानंही आज २२ उमेदवारांची दुसरी यादी आज जाहीर केली. यात माळशिरसमधून उत्तम जानकर, फलटण इथून दीपक चव्हाण, खडकवासला इथून सचिन दोडके, अकोले इथून अमित भांगरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. बीड इथून संदीप क्षीरसागर, गंगापूरमधून सतीश चव्हाण, येवला इथून माणिकराव शिंदे यांना रिंगणात उतरवण्यात आलं आहे. काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन्ही पक्षांनी आपापल्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. काँग्रेसनं राळेगाव इथून माजी मंत्री वसंत पुरके, सावनेरमधून अनुजा केदार, अर्जुनी-मोरगाव इथून दिलीप बनसोड, जालन्यातून कैलास गोरंट्याल आणि शीव-कोळीवाडा मतदारसंघातून गणेश यादव यांच्यासह एकूण २३ जणांची उमेदवारी आज जाहीर केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे आज १८ उमेदवारांची घोषणा झाली. धुळ्यातून अनिल गोटे, हिंगोलीतून रूपाली पाटील, शिवडीतून अजय चौधरी तर भायखळ्यातून मनोज जामसुतकर रिंगणात आहेत. तसंच वर्सोवा इथून हरून खान, घाटकोपर पश्चिम इथून संजय भालेराव आणि विलेपार्ले इथून संदीप नाईक यांच्या नावांची घोषणाही पक्षाने केली आहे.

**<><><><><>**

उद्धव ठाकरे आणि काँग्रेसमध्ये काही जागांची अदलाबदल करण्यासंदर्भात आज चर्चा झाली. काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी ही माहिती दिली. १८० पेक्षा अधिक जागा जिंकण्याचं महाविकास आघाडीचं लक्ष्य असल्याचं ते यावेळी म्हणाले. जागावाटपाच्या चर्चा शेवटच्या क्षणापर्यंत चालू

असतात, महाविकास आघाडीचे घटक पक्ष मैत्रिपूर्ण लढती करणार नाहीत, असंही थोरात यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी हिंदुत्वाची भूमिका घेतली तसंच भाजपाला मदत केली, त्यामुळे त्यांचे पुत्र अमित ठाकरे यांना माहिम मतदारसंघात निवडणुकीत मदत करायला हवी, असं भाजपचे मुंबई प्रदेशाध्यक्ष आशीष शेलार यांनी म्हटलं आहे.  यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याशी चर्चा करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालना इथं अपक्ष उमेदवार देण्याऐवजी महाराष्ट्र स्वराज्य पक्षातून उमेदवार उभे करावेत असा प्रस्ताव महाराष्ट्र स्वराज्य पक्षप्रमुख संभाजी राजे छत्रपती यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्याकडे मांडला. संभाजी राजे छत्रपती यांनी आज जालना जिल्ह्यातल्या अंतरवली सराटी इथं जरांगे यांची भेट घेऊन निवडणूक लढण्यासंदर्भात सविस्तर चर्चा केली. दरम्यान मंत्री उदय सामंत यांनीही आज मनोज जरांगे यांची भेट घेतली.

**<><><><>**

निवडणुकीत महिलांची मतं मिळावीत म्हणून लाडकी बहीणसारख्या योजना सरकारनं जाहीर केल्या आहेत, असं मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत व्यक्त केलं. या सर्व योजनांचा उहापोह प्रचारात करणार असून आम्ही परिवर्तनासाठी आग्रही आहोत,

असं ते पुढे म्हणाले. या सरकारनं नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अजूनही भरपाई दिलेली नाही, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात काल झालेल्या प्रकाराचा भाजपानं निषेध केला आहे. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्येविषयी भाजपाच्या एका नेत्यानं प्रचार सभेत अपशब्द काढले होते. हे प्रकार खपवून घेणार नसल्याचं प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलंय.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी तयार करण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचाररथाला आज राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी हिरवा झेंडा दाखवला. यावेळी खासदार सुनील तटकरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादीने आपल्या प्रचारासाठी ही एक विशेष एलईडी व्हॅन तयार केली असून या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांचा प्रचार करण्यात येणार आहे. महायुतीच्या काळात राबवलेल्या विविध योजना मतदारांना दाखवण्यात येणार आहेत.

**<><><><>**

राज्यात येत्या विधानसभा निवडणुकीसाठी दुर्गम भागातल्या आणि योग्य संपर्क यंत्रणा नसलेल्या नागरिकांना मतदान करता यावी यासाठी ९१५ मतदान केंद्रं उभारण्यात येणार असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. अशा प्रकारच्या मतदान केंद्रांना शॅडो मतदान केंद्रं असं म्हणतात.

रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक २३२ तर सांगलीत केवळ एकच  शॅडो मतदान केंद्र असेल. ही शॅडो मतदान केंद्रं २४ जिल्ह्यांमध्ये असून यामध्ये मतदानाच्या दिवशी विशेष सुविधा असतील. त्यात विशेष मेसेंजर, वॉकी-टॉकी, व्हीएचएफ हे उच्च क्षमतेचे फोन, वायरलेस सेंटर, वायरलेस कम्युनिकेशन सेवा, सॅटेलाईट फोन, वन आणि पोलीस विभागाचा रनर यांचा समावेश आहे. या बरोबरच  बीएसएनएलमार्फत पर्यायी कम्युनिकेशन यंत्रणाही कार्यरत असेल.१२ जिल्ह्यांमध्ये शॅडो मतदान केंद्र उभारण्यात येणार नाहीत.

**<><><><><>**

प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अनिल गावंडे यांनी आज अकोला इथं भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. वाशिम जिल्ह्यात माजी आमदार प्रकाश डहाके आणि त्यांच्या पत्नी सई डहाके यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षातून भाजपा मध्ये प्रवेश केला.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज मुंबई शहर या जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

सक्त वसुली संचालनालयानं कोल्डप्ले आणि दिलजीत दोसान्जी दिलुमिनाती या संगीत कार्यक्रमांच्या तिकीट विक्रीत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी काल दिल्ली, मुंबई, जयपूर, चंदीगढ, बंगळुरु इथं छापे टाकले. त्यात गैरव्यवहारासाठी वापरण्यात

आलेले मोबाईल, लॅपटॉप, सिम कार्ड आणि विविध साहित्य जप्त केल. या संगीत कार्यक्रमांच्या तिकीटविक्रीत काळाबाजार करुन ती चढ्या भावानं विकण्यात आली होती.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता आकाशवाणीवर ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशविदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११५ वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, आकाशवाणी वृत्त संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एआयआर या ॲपवर प्रसारित केला जाईल.

<><><><><>

नाशिक मधली कांद्याची सर्वात मोठी बाजारपेठ असलेली लासलगाव कृषि उत्पन्न बाजार समिती दिवाळी निमित्त २८ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान बंद असेल. सोमवार ते  शनिवार व्यापारी कांदा खरेदी करणार असल्यानं हे ६ दिवस बाजार समिती बंद राहणार असल्याची माहिती प्रशासानं दिली आहे.

<><><><><>

न्यूझीलंडविरुद्ध तीन क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेतल्या सलग दुसऱ्या सामन्यात आज भारताचा पराभव झाला. पहिल्या डावातल्या १०३ धावांच्या महत्वपूर्ण आघाडीसह न्यूझीलंडने विजयासाठी दिलेल्या एकूण ३५९ धावांच्या आव्हानाचा सामना करताना भारतीय संघाचा दुसरा डाव २४५ धावांत आटोपला. आजच्या पराभवासह  भारताने ही मालिकाही गमावली आहे. मालिकेतला शेवटचा सामना १ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

भारतीय संघाच्या दुसऱ्या डावात सलामीवीर यशस्वी जयस्वाल याने केलेल्या ७७ धावा आणि रविंद्र जडेजाच्या ४२ धावांचा अपवाद वगळता इतर फलंदाज फारशी चमक दाखवू शकले नाहीत. न्यूझीलंडच्या मिशेल सतनेर याने दुसऱ्या डावात भारताचे सहा गडी बाद केले. दोन्ही डावात मिळून १३ गडी टिपणारा सतनेर सामनावीर ठरला.

**<><><><><>**

मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी काल पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी, गोव्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात काल सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली. येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे तर विदर्भात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**